# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१
०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० फॅकस ०२२ २२०१८५३९ E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

---

जा.क्र.राआ/महा./ कोरोना/अत्या. काम. / २०२०/ १४३१ दिनांकः- ०३.०५.२०२०

वाचाः- १. राज्य आयोगाचे परिपत्रक क्र.राआ/महा./ अत्या. काम./२०२०/१४२७ दि.२३.०४.२०२०
२. शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र. ३५/१८ (र.व का.) दि. २२.०४.२०२०
३. राज्य शासनानाची अधिसुचना क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-I, दि. ०२.०५.२०२०

## कार्यालयीन आदेश

वरील संदर्भिय क्र. १ च्या अनुषंगाने राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या कामकाजाबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. तथापि वरील संदर्भिय क्र. ३ च्या अधिसुचनेनुसार राज्यातील लॉकडाऊन दि. १७.०५.२०२० पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. तसेच संदर्भिय क्र. २ च्या मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र ( M.M.R.) तसेच पुणे महानगर प्रादेशिक विकास क्षेत्रातील (P.M.R.) क्षेत्रातील शासकीय कार्यालयातील उपस्थितीचे प्रमाण ५ टक्के इतके करण्यात आलेले आहे .

सदर निर्देशाच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांनी दिलेल्या निर्देशानुसार दि. ०४.०५.२०२० रोजीपासून खालील कर्मचा-यांची तात्काळ कामकाजाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अनु क्र. | कार्यालय | उपस्थितीचे दिवस | कर्मचा-याचे नाव | पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | काळा घोडा कार्यालय | ०४.०५.२०२० | श्री. आ. ह. मालवे | लघुलेखक |
| | | | श्री. दरेकर | शिपाई |
| २ | सीएसटी कार्यालय | ०५.०५.२०२० | श्री. यादव | वरिष्ठ लिपीक |
| | | | श्री. कर्णे | शिपाई |
| ३ | काळा घोडा कार्यालय | ०६.०५.२०२० | श्री. आ. ह. मालवे | लघुलेखक |
| | | | श्री. दरेकर | शिपाई |
| ४ | सीएसटी कार्यालय | ०८.०५.२०२० | श्री. यादव | वरिष्ठ लिपीक |
| | | | श्री. कर्णे | शिपाई |
| ५ | काळा घोडा कार्यालय | ११.०५.२०२० | श्री. भुषण पंचभाई | शिरस्तेदार |
| | | | श्री. मि. वा. तुळसकर | बेलिफ |
| ६ | सीएसटी कार्यालय | १२.०५.२०२० | श्री. सतीश हिरे | शिरस्तेदार |
| | | | श्री. मोदगेकर | शिपाई |
| ७ | काळा घोडा कार्यालय | १३.०५.२०२० | श्री. भुषण पंचभाई | शिरस्तेदार |
| | | | श्री. मि. वा. तुळसकर | बेलिफ |
| ८ | सीएसटी कार्यालय | १४.०५.२०२० | श्री. सतीश हिरे | शिरस्तेदार |
| | | | श्री. मोदगेकर | शिपाई |
| ९ | काळा घोडा कार्यालय | १५.०५.२०२० | श्री. घाडगे | वरिष्ठ लिपीक |
| | | | श्री. शेख | शिपाई |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कर्मचा-यांनी कार्यालयात हजर रहावे व गरजेप्रमाणे दोन्ही कार्यालयाचे कामकाज सांभाळावे. तसेच वरील कर्मचा-यांव्यतिरिक्त इतर कर्मचा-यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी प्रबंधक विधी किंवा प्रबंधक प्रशासन यांच्याशी दुरध्वनी द्वारे संपर्कात रहावे. प्रबंधक प्रशासन किंवा प्रबंधक विधी यांना आवश्यकता वाटल्यास ठराविक कर्मचारी अथवा सर्व कर्मचा-यांना दुरध्वनीद्वारे हजर राहण्याबाबत आदेश देऊ शकतील. सदर आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहिल. सदर आदेशाचे पालन न करता रजेचे अर्ज सादर केल्यास सदरची रजा नामंजुर करण्यात येईल व शिस्त भंगाची कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

संदर्भिय क्र. २ मधील अधिसुचनेसोबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनांमधील पृष्ठ क्र. ७ वरील ७(ii)(g) मध्ये नमुद केलेल्या विभांगाव्यतिरिक्त राज्य आयोग व जिल्हा मंच कार्यालयामधील उपस्थितीचे प्रमाण ३३ टक्केपर्यत राहिल याची काळजी संबधित कार्यालयप्रमुखांनी घ्यावी व कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबतचे योग्य ते नियोजन करावे व अहवाल सादर करावा.

Sd/-
(मु. पां. भावसार)
प्रबंधक प्रशासन,
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र मुंबई.

प्रतः-

१. मा. न्यायिक सदस्य व मा. सदस्य राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई / औरंगाबाद/ नागपूर यांना माहितीस्तव व सविनय सादर.

२. मा. सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. अध्यक्ष व मा. सदस्य सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांना माहितीस्तव सविनय सादर.

३. प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई / औरंगाबाद/ नागपुर

४. प्रबंधक सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच

५. राज्य आयोगाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना माहितीस्तव.